

# गुढी पाडवा

गुढी पाडव्याची परंपरा अपुली
आहे खुप खुप वर्षांपूर्वीपासूनची जूनी
जगाची झाली होती निर्मिती
देवर्षि ब्रह्माच्या हस्ते आजच्याच दिनी
झाला इथूनच सुरु कालगणनेचाही प्रारंभ
'विजय' नाम संवत्सराने, झाला सोहळ्याचा शुभारंभ ...
दारी तोरण, सडा संमार्जन, रंगावलीने सुशोभीत अंगण
प्रवेशद्वारावरी डोलात उंच गुढी शोभते मंगल
पौराणीक आख्यायिका पण, महती सणाची सांगते अखंड
होवूनी प्रसन्न इंद्रदेवाने, वसुराजाला दिला राजदंड !!
घरी आणताच, टोकाला बांधूनी, रेशमी वस्त्र भरजरी
ठेविला सुवर्णाचा चंबु त्यावरी, सुगंधित पुष्पमाला भवताली ...
साखरेच्या गाठी पदकाची माळ, कोवळा कोवळा कडुनिंबाचा मोहोर
नैवेद्याशी ठेवूनी. यथासांग, उभारीली उंच, होवूनी आनंद विभोर !!
तेव्हापासून वर्षानुवर्षे घरोघरी, गुढीची परंपरा खास ही
चैत्रमासाच्या नववर्षदिनी होतसे साजरी, आजही !!
हिच पर्वणी साधून, चौदा वर्षांचा वनवास संपवूनी
आले प्रभु श्रीराम, जानकी, लक्ष्मणासह अयोध्येस परतूनी
स्वागतास त्यांच्या सजली होती नगरी, गुढ्या तोरणे उभारुनी
अशा संपन्न गुढीपाडवा संस्कृतीचे संवर्धन करुया आनंदानी !!
शुभारंभ करी शक गणनेचा
करुन पराभव दुष्ट जनांचा
शालिवाहन नृपती आठवा, चैत्रमासीचा गुढीपाडवा !!
गुढी ही प्रतिक यश समृद्धीचे, संपन्नतेचे
सार्थक तिचे आहे उंच उंच गगनात झेपावण्याचे ...



सौ. विजया पुरुषोत्तम जोशी.